# उसने दिलेले पैसे परत मागणाऱ्या इसमाचे अपहरण करुन खुन करुन मृतदेहाची ताम्हीणी घाटात विल्हेवाट लावणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा युनिट ०२ व चिंचवड पोलीस स्टेशन पोलीसांनी केले जेरबंद

चिंचवड पोलीस स्टेशन येथे एका इसमास ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे अपहरण करुन जबरदस्तीने त्याच्याच ब्रेझा गाडी मधुन पळवुन नेलेचा गुन्हा घडल्याने त्याबाबत चिंचवड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नंबर ३१५/२०२३ भा.दं.वि. कलम ३६४, ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना त्यातील एका आरोपी नामे नारायण बापुराव इंगळे, रा. चिंचवडगाव, पुणे यास चिंचवड पोलीस स्टेशन कडील पथकाने ताब्यात घेतले असता. त्याचेकडे गुन्हे शाखा युनिट ०२ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम व स्टाफने तसेच चिंचवड पोलीस स्टेशन यांनी तपास केला असता, नारायण इंगळे याने पंजाब-सिंध बँकेत मॅनेजर या पदावरुन सेवानिवृत्त झाले. श्री. रणजित मेला सिंग वय- ७० वर्षे, रा. ओरा कौंटी, प्लॅट नं. सी-१ प्लॅट नं. ९०४, उबाळे नगर, वाघोली, पुणे यांच्याकडुन ३० लाख रुपये इसने घेतले होते. ते पसै परत दे म्हणुन श्री. रणजित मेला सिंग यांनी नारायण इंगळे याच्याकडे सतत तगादा लावल्याने नारायण इंगळे यांना ते पैसे परत करायचे नसल्याने त्याने त्याचे मित्र १) राजेश नारायण पवार २) समाधान ज्ञानोबा म्हस्के दोघे रा. चिखली, पुणे यांना श्री. रणजित मेला सिंग यांचा खुन करण्यासाठी ४ लाख रुपयांची सुपारी दिली होती. नारायण इंगळे याने श्री. रणजित मेला सिंग यांना दिनांक १९/०४/२०२३ रोजी पैसे देतो म्हणुन बोलावुन घेवुन तिघांनी मिळुन त्यांचे अपहरण करुन खुन केला व त्यांच्या मृतदेहाची व गाडीची विल्हेवाट १) राजेश पवार २) समाधान म्हस्के यांनी लावली आहे. अशी माहिती मिळताच

लागलीच गुन्हे शाखा युनिट ०२ कडील पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक गणेश माने, पोलीस हवा. ४४३ प्रमोद वेताळ, पोलीस हवा. ८३२ जयवंत राऊत, पोलीस नाईक १६०३ देवा राऊत यांचे पथक सदर आरोपींचा शोध घेत असता. पो हवा. ८३२ जयवंत राऊत व पो. हवा. ४४३ प्रमोद वेताळ यांना त्यांच्या गोपनिय बातमीदारा कडुन सदर गुन्हयातील आरोपी हे चिखली घरकुल परीसरात असलेबाबतची माहिती मिळाली असता. गुन्हे शाखा युनिट ०२ कडील स्टाफने वेशांतर करुन आरोपींचा घरकुल चिखली परीसरात शोध घेवुन. सापळा रचुन शिताफीने आरोपींना घरकुल चौक, चिखली परीसरातुन ताब्यात घेतले. त्यांचेकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता आम्हांस काहि माहिती नाही, आम्ही नारायण इंगळे यांना ओळखत नाही. आम्हांला कशाला पकडले आम्हि काहि केली नाही असे बोलुन ते उडवा उडवीची उत्तरे देवु लागले असता त्यांना गुन्हे शाखा युनिट ०२ कार्यालयात आणुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींनी सागितले की, त्याचा मित्र नामे नारायण बापुराव इंगळे, रा. चिंचवडगाव, पुणे याने त्यांना ४ लाख रुपयाची सुपारी दिली असुन त्याबदल्यात श्री. रणजित मेला सिंग यास ठार मारुन त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची.

दिनांक १९/०४/२०२३ रोजी नारायण इंगळे यांनी त्याच्या चिंचवड येथिल राहत्या घरी श्री. रणजित मेला सिंग यांना पैसे देतो म्हणुन बोलावुन घेतले. ते घरी आल्यानंतर त्यांच्या सोबत बोलत असताना नारायण इंगळे व राजेश पवार यांनी मागुन येवुन श्री. रणजित मेला सिंग यांचा दोरीने गळा आवळुन व समाधान म्हस्के याने चाकुने चार ते पाच वेळा भोकसुन ठार मारले. त्यांनतर त्याचा मृतदेह प्लास्टिक मध्ये गुंडाळुन बेडशिटमध्ये बांधुन श्री. रणजित सिंग यांच्या लाल रंगाच्या ब्रेझा गाडीत टाकुन राजेश पवार व समाधान म्हस्के यांनी त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट ताम्हीणी घाटात धबधब्या जवळच्या नाल्यात टाकुन व गाडी माणगाव एम.आय.डी.सी. परीसरात सोडल्याची सांगितले. आरोपींनी मयत इसमाच्या मृतदेहाची विल्हेवाट लावलेले ठीकाण व गाडी सोडल्याचे ठीकाण दाखवुन दिले त्याप्रमाणे पोलीसांनी मयत इसमाचा मृतदेह व गाडी ताब्यात घेतली असुन अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई हि विनय कुमार चोबे पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे पोलीस सह आयुक्त, वसंत परदेशी अप्पर पोलीस आयुक्त, स्वप्ना गोरे पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त सतिश माने गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ०२ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, कृष्णदेव खराडे व.पो.नि., प्रकाश जाधव, पो.नि. (गुन्हे), चिंचवड पोलीस स्टेशन, पोलिस उप-निरीक्षक गणेश माने, पोलीस उप-निरीक्षक शंभु रणवरे, गुन्हे शाखा युनिट ०२ कडील पोलीस अंमलदार जयवंत राऊत, प्रमोद वेताळ, देवा राऊत जमिर तांबोळी, संतोष इंगळे, सागर अवसरे, विपुल जाधव, आतिष कुडके चिंचवड पोलीस स्टेशन कडील पोलीस अंमलदार पांडुरंग जगताप, धर्मनाथ तोडकर, पंकज बदाणे, उमेश वानखेडे यांच्या पथकाने कारवाई केली.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त**
**गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड.**